राष्ट्रीय/राज्य अपंग पुरस्कार प्राप्त शासकीय कर्मचारी/शिक्षक यांना दोन/एक आगाऊ वेतनवाढी देण्याबाबत....

महाराष्ट्र शासन

समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग
क्रमांक: इडीडी-१०९१/१८००/प्र.क्र.२६३/सुधार-२.
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२.

दिनांक: २९ डिसेंबर, १९९३.

वाचा:- १] शासन निर्णय, शिक्षण व सेवा योजन विभाग, क्र.पीटीसी-१०८४/[३०७२]/साशि-३, दि. ३०.४.१९८४.

२] शासन निर्णय, शिक्षण व सेवा योजना विभाग, क्र.पीटीसी-१०९०/५८२०/संस्कृती-१, दि. १७.१.१९९१.

३] संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.अपंग/आसेवा/९०-९१/का-२७/१२६, दिनांक १०.१.१९९१.

शासन निर्णय- समाजातील अंध, मुकबधिर, अस्थिव्यंग, व मनोदुर्बल व इतर कारणामुळे अपंगत्व आलेल्या व्यक्तींना समाजाचा कार्यशील व जबाबदार नागरीक म्हणून जगता यावे यासाठी शासनामार्फत अपंगाचे शिक्षण, प्रशिक्षण व शारिरीक व आर्थिक पुनर्वसनाच्या अनेक योजना राबविल्या जातात. सन १९७८ पासून शासनाने अपंगासाठी शासकीय व निमशासकीय सेवेत तीन टक्के आरक्षणही ठेवले आहे. केंद्र शासनामार्फत देण्यात येणा-या अपंग राष्ट्रीय पुरस्काराच्या धर्तीवर शासकीय/निमशासकीय अपंग कर्मचारी व स्वयंरोजगार करणा-या व्यक्ती यांना राज्य अपंग पुरस्कार देण्याची योजना सन १९८२ पासून शासनामार्फत सुरु आहे.

२. राज्यातील मान्यता प्राप्त शाळांमध्ये कार्यरत असलेल्या राष्ट्रीय पुरस्कार व राज्य पुरस्कार प्राप्त शिक्षकांना प्रोत्साहन म्हणून दोन/एक आगाऊ वेतनवाढी देण्याची योजना सन १९८४ पासून कार्यान्वित आहे. त्याच धर्तीवर राष्ट्रीय/राज्य अपंग पुरस्कार प्राप्त शासकीय कर्मचारी/शिक्षक यांना दोन/एक आगाऊ वेतनवाढ देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्यास अनुसरुन शासन आता राष्ट्रीय अपंग पुरस्कार प्राप्त कर्मचा-यांना दोन आगाऊ वेतनवाढी व राज्य अपंग पुरस्कार प्राप्त कर्मचा-यांना एक आगाऊ वेतनवाढ देण्याच्या प्रस्तावास मान्यता देत आहे.

३. सदर योजनेची अंमलबजावणी १.११.१९९३ पासून होईल. आजतागायत अपंग राष्ट्रीय/राज्य पुरस्कार मिळालेल्या सर्व अपंग कर्मचा-यांनाही सदर योजनेचा फायदा १.११.१९९३ पासून देण्यात यावा. संपूर्ण सेवा कालावधीत सदर योजनेखाली मिळणा-या आगाऊ वेतनवाढीची संख्या जास्तीत जास्त दोन असेल.

४. सदर आगाऊ वेतनवाढी मंजूर करताना पुरस्कार प्राप्त कर्मचारी x

....२/-

शिक्षक यां-च्या मूळ वेतनवाढीच्या दिनांकात बदल करू नये. जर पुरस्कार प्राप्त कर्मचारी पुरस्कार जाहिर झालेल्या दिवशी किरकोळ रजेव्यतिरिक्त अन्य रजेवर असतील तर, त्यांना सदर वेतनवाढ देताना ते जेव्हा रजेवरून पुन्हा रूजू होतील त्या दिवसापासून सदर वेतनवाढ देण्यात यावी.

५. त्याचप्रमाणे जे पुरस्कार प्राप्त कर्मचारी/शिक्षक त्यांच्या वेतनश्रेणीच्या कमाल मर्यादेवर पोहोचलेले असतील व त्यामुळे दोन/एक आगाऊ वेतनवाढीचा लाभ प्रत्यक्षात मिळणार नाही अशा कर्मचा-यांना/शिक्षकांना त्यांच्या वेतनश्रेणीच्या कमाल मर्यादेच्या अगोदरच्या वेतनवाढीच्या ४८ [अठ्ठेचाळीस] पट रोख रक्कम देण्यात यावी. [उदा. पुरस्कार प्राप्त कर्मचा-यांची वेतनश्रेणी [जुनी] रू.-३३५-१५-५००-२०-५८०-विस्तार-२०-६८० असेल तेव्हा वेतनवाढ रू. २०x४८= ९६० याप्रमाणे रोख रक्कम मिळेल.]

६. सदर बाबींवर होणारा खर्च संबंधित कर्मचा-यांचे वेतन व भत्ते ज्या वित्तीय शिर्षाखालून व ज्या आस्थापनेमार्फत दिले जाते त्याखाली चालू वित्तीय वर्षासाठी केलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा.

७. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांच्या अनौ. संदर्भ क्र. ८६४/९३/व्यय-११, दि. ९. १२. १९९३ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

ब. वि. सोनावणे

[ ब. वि. सोनावणे ]
शासनाचे उप सचिव.

प्रति,